RNI No. MAHBIL /2009/31732

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग चार-अ

वर्ष ११, अंक ५] गुरुवार ते बुधवार, सप्टेंबर ११-१७, २०२५/ भाद्रपद २०-२६, शके १९४७ [पृष्ठे ४, किंमत : रुपये ९.००

### प्राधिकृत प्रकाशन

महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.

### वित्त विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक ९ सप्टेंबर २०२५.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक मनासे-२०२४/प्र.क्र.३९/सेवा-४.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून महाराष्ट्राचे राज्यपाल महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ ला सुधारणा करणारे पुढील नियम करीत आहेत :—

१. या नियमास महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) (सुधारणा) नियम, २०२५ असे म्हणावे.

२. महाराष्ट्र नागरी सेवा (निवृत्तिवेतन) नियम, १९८२ (यात यापुढे ज्याचा उल्लेख " प्रधान नियम " असा करण्यात आला आहे) च्या नियम २ मधील उपनियम (२) नंतर खालीलप्रमाणे परंतुक दाखल करण्यात येत आहे –

"परंतु असे की, हे नियम १ नोव्हेंबर २००५ रोजी किंवा त्यानंतर नागरी सेवेत नियुक्त केलेल्या शासकीय कर्मचाऱ्यास लागू राहील, जर तो या संदर्भात शासनाने निर्गमित केलेल्या कोणत्याही विशेष किंवा सर्वसाधारण आदेशानुसार आवश्यक अटींची पूर्तता करत असेल."

३. प्रधान नियमाच्या नियम ५९ मधील उपनियम (१) मध्ये "राजपत्रित अधिकाऱ्याच्या बाबतीत लेखा परीक्षा अधिकारी आणि अराजपत्रित कर्मचाऱ्याच्या बाबतीत, लेखापरीक्षा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून कार्यालय प्रमुख" या शब्दांऐवजी "लेखापरीक्षा अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून कार्यालय प्रमुख" हे शब्द दि. १ जानेवारी १९९० पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल.

४. प्रधान नियमाच्या नियम ७३ मधील :–

(ए) परंतुकामध्ये, खंड (ए) मधील, " ७,२०० " या आकड्याऐवजी " ५४,००० " हा आकडा दिनांक १ जानेवारी २०१६ पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल ;

(बी) टीप (२) मध्ये, " ७,२०० " या आकड्याऐवजी " ५४,००० " हा आकडा दिनांक १ जानेवारी २०१६ पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल.

५. प्रधान नियमाच्या नियम ७४ मधील " रुपये ४८" ऐवजी " सार्वजनिक आरोग्य विभागाकडून विहित करण्यात आलेले शुल्क " अशी सुधारणा करण्यात येत आहे.

६. प्रधान नियमाच्या नियम ७५ मधील " रुपये ४८" ऐवजी " सार्वजनिक आरोग्य विभागाकडून विहित करण्यात आलेले शुल्क " अशी सुधारणा करण्यात येत आहे.

७. प्रधान नियमाच्या नियम ११० मधील उप-नियम (५) मधील तक्त्याऐवजी खालील तक्ता दिनांक १ जानेवारी २०२४ पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल :-

" तक्ता

| अ. क्र. (१) | निवृत्तिवेतनधारकाचे वय (२) | वाढीव निवृत्तिवेतन (३) |
|---|---|---|
| १ | वय वर्षे ८० ते ८५ | मूळ निवृत्तिवेतनात वीस टक्के वाढ |
| २ | वय वर्षे ८५ पेक्षा अधिक ते ९० | मूळ निवृत्तिवेतनात तीस टक्के वाढ |
| ३ | वय वर्षे ९० पेक्षा अधिक ते ९५ | मूळ निवृत्तिवेतनात चाळीस टक्के वाढ |
| ४ | वय वर्षे ९५ पेक्षा अधिक ते १०० | मूळ निवृत्तिवेतनात पन्नास टक्के वाढ |
| ५ | वय वर्षे १०० पेक्षा अधिक | मूळ निवृत्तिवेतनात शंभर टक्के वाढ |

"

८. प्रधान नियमाच्या नियम ११५ मधील उप-नियम (७) मधील

(ए) खंड (ए) ऐवजी खालील खंड दि. १ जानेवारी १९९० पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल :-

"(ए) या नियमानुसार शासकीय कर्मचाऱ्याने (राजपत्रित शासकीय कर्मचारी धरुन) केलेले प्रत्येक नामनिर्देशन (ते रद्द करण्यासाठी त्याने दिलेली असल्यास, प्रत्येक नोटीस धरुन) कार्यालय प्रमुखाकडे पाठवले जाईल."

(बी) खंड (बी) मध्ये " यथास्थिती लेखापरीक्षा अधिकारी किंवा कार्यालय प्रमुख " या शब्दाऐवेजी " कार्यालय प्रमुख " हे शब्द दिनांक १ जानेवारी १९९० पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल.

९. (ए) प्रधान नियमाच्या नियम ११६ मधील उप-नियम (२-अ) मधील तक्त्याऐवजी पुढील तक्ता दि. १ जानेवारी २०२४ पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल :–

" तक्ता

| अ. क्र. (१) | कुटुंब निवृत्तिवेतनधारकाचे वय (२) | वाढीव कुटुंब निवृत्तिवेतन (३) |
|---|---|---|
| १ | वय वर्षे ८० ते ८५ | मूळ कुटुंब निवृत्तिवेतनात वीस टक्के वाढ |
| २ | वय वर्षे ८५ पेक्षा अधिक ते ९० | मूळ कुटुंब निवृत्तिवेतनात तीस टक्के वाढ |
| ३ | वय वर्षे ९० पेक्षा अधिक ते ९५ | मूळ कुटुंब निवृत्तिवेतनात चाळीस टक्के वाढ |
| ४ | वय वर्षे ९५ पेक्षा अधिक ते १०० | मूळ कुटुंब निवृत्तिवेतनात पन्नास टक्के वाढ |
| ५ | वय वर्षे १०० पेक्षा अधिक | मूळ कुटुंब निवृत्तिवेतनात शंभर टक्के वाढ |

"

(बी) उप-नियम (४) मध्ये खंड (सी) नंतर खालील खंड दि. १ जानेवारी २०१६ पासून लागू झाल्याचे मानण्यात येईल –

"(डी) कोणत्याही बाबतीत कुटुंब निवृत्तिवेतनाची रक्कम दरमहा सात हजार पाचशे रुपयांहून कमी असता कामा नये."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**मनिषा यु. कामटे,**
शासनाच्या उप सचिव.